महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ९६ वे | दिनांक : ३०/०३/२०२६ | वार : सोमवार

# ब्लॅक मनी व्हाईट करण्याचा धंदा? तिसरा व्यक्ती कोण? सुषमा अंधारे



**मुंबई** : भोंदू अशोक खरात प्रकरणात आता दररोज नवनवीन खुलासे होत असून, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी आज पुन्हा एकदा पत्रकार परिषद घेऊन खळबळजनक आरोप केले आहेत. अशोक खरात आणि शिंदे गटाचे आमदार दीपक केसरकर यांच्यातील दुव्याचे फोटो पुराव्यासह सादर करत, अंधारे यांनी या प्रकरणात 'ब्लॅक मनी व्हाईट' करण्याचे मोठे रॅकेट सक्रिय असल्याचा संशय व्यक्त केला आहे. "केसरकरांसोबत प्रत्येक फोटोत दिसणारा तो 'पिवळ्या शर्टाचा' माणूस नेमका कोण?" असा सवाल अंधारे यांनी केला आहे. या आरोपांमुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

अशोक खरात प्रकरणात ठाकरे गटाकडून याआधी देखील शिंदे गटाचे आमदार दीपक केसरकर यांचे खरातसोबतचे फोटो दाखवत गंभीर आरोप केले होते. त्यानंतर दीपक केसरकर यांनी देखील पत्रकार परिषद घेतली. अशोक खरात प्रकरणाशी माझा संबंध नसल्याचे सांगत, त्यांनी विरोधकांचे आरोप फेटाळून लावले. राजकीय द्वेषापोटी माझ्याविरोधात कट कारस्थान असल्याचे दीपक केसरकर म्हणाले होते. आज सुषमा अंधारे यांनी पुन्हा काही फोटो समोर आणून मोठे दावे केलेत.

सुषमा अंधारे यांनी आजच्या पत्रकार परिषदेत काही छायाचित्रे दाखवली. यात एक पिवळा शर्ट घातलेला व्यक्ती प्रत्येक ठिकाणी केसरकर आणि अशोक खरात यांच्यासोबत दिसत आहे. नामकर्ण एकनाथ आवारे असे त्या व्यक्तीचे नाव आहे. अंधारे म्हणाल्या, "मी आधीही एमआयडीसी गेस्टहाऊसमधील फोटो दाखवले होते. हा माणूस केसरकरांसोबत नेमका काय करतोय? इतकेच नाही तर चाकणकर जेव्हा खरातची पाद्यपूजा करत होत्या, तेव्हाही हा व्यक्ती तिथे हजर होता. या माणसाचे नाव नामकर्ण एकनाथ आवारे असून तो 'जगदंब पतसंस्थेचा' प्रमुख आहे," अशी माहिती अंधारे यांनी उघड केली.

नामकर्ण आवारे याच्या भूमिकेवर संशय व्यक्त करताना सुषमा अंधारे यांनी अत्यंत गंभीर आरोप केला आहे. त्या म्हणाल्या, "मी जेव्हा या आवारेची माहिती घेतली, तेव्हा अनेक बड्या नेत्यांचे आणि अधिकाऱ्यांचे 'ब्लॅक मनी' जगदंब पतसंस्थेमार्फत 'व्हाईट' करण्याचे काम हा माणूस करतो, असे दबक्या आवाजात बोलले जाते. जो माणूस अशा व्यवहारांसाठी ओळखला जातो, तो केसरकरांसोबत वारंवार का दिसतो? आवारे, खरात आणि केसरकर यांच्यात कोणते आर्थिक व्यवहार सुरू आहेत, याचे उत्तर केसरकरांनी दिले पाहिजे," अशी मागणी सुषमा अंधारे यांनी केली.

दीपक केसरकर यांनी आपल्यावर होत असलेले आरोप हे 'कट कारस्थान' असल्याचे म्हटले होते. पण सुषमा अंधारे यांनी हा आरोप फेटाळून लावला. यावर बोलताना सुषमा अंधारे म्हणाल्या की, "केसरकर म्हणतात माझ्याविरोधात कारस्थान सुरू आहे, पण हे ऐकून मला दुःख वाटत नाही, तर त्यांचे विधान बालिश आणि हास्यास्पद वाटते. जर ते विचारत असतील की 39 लोक सोडून मलाच का लक्ष्य केले जात आहे? तर याचा अर्थ असा होतो की, केसरकर स्वतः मान्य करत आहेत की ते अशोक खरातच्या संपर्कात होते. केसरकरांनी 'भांडाफोड करेन' अशी पोकळ धमकी देण्यापेक्षा, त्या 39 लोकांची नावे एकदाची सांगूनच टाकावीत," असे थेट आव्हान सुषमा अंधारे यांनी दिले.

# राष्ट्रवादीच्या बॅनरवरून अजितदादांसह सुनेत्रा पवारांचाही फोटो गायब




**मुंबई** : महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात अनेक बदल पाहायला मिळत आहेत. आता अजित पवारांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी पक्षाचे सूत्र प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या हाती जात आहेत की काय? अशी शंका उपस्थित केली जात आहे. शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी देखील काही दिवसांपूर्वी सुनील तटकरे तसेच प्रफुल्ल पटेल यांच्यावर आरोप करताना म्हटले होते की, तटकरे आणि पटेल यांना पक्षावर कब्जा करायचा आहे. आता इंदापूर येथे झालेल्या पक्षाच्या कार्यक्रमातील बॅनरवर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांचा तसेच अजित पवार यांचाही फोटो गायब असल्याचे पाहायला मिळाले आहे.

यावरून राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे नेते विकास लवांडे यांनी ट्विट करत टीका केली आहे. ते म्हणाले, अजितदादांचा राष्ट्रवादी पक्ष ताब्यात घेण्याचे आधीपासूनचेच मनसुबे लपून राहिलेले नाहीत. त्याची सुरुवात रायगडपासून झाली आहे. आदरणीय अजित दादांचा आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार वहिनींचा पक्षाच्या अधिकृत कार्यक्रमात बॅनरवर नाव किंवा फोटो सुद्धा नाही. याला कृतघ्नता म्हणतात, अशी टीका त्यांनी केली आहे.

पुढे बोलताना विकास लवांडे म्हणाले, अजित दादांनी यांना पक्षाच्या प्रदेशाध्यक्ष पदावर अनेक वर्षे ठेवल्यामुळे त्यांची राज्य पातळीवर प्रतिष्ठा वाढली. यांनी पक्षांतर्गत ओबीसी मराठा असा जातीयवाद सुद्धा वाढवलेला आहे जे अजितदादांना पटत नव्हते. सुनील तटकरे तुमच्यात हिम्मत असेल तर स्वतःचा पक्ष प्रफुल्ल पटेल यांना सोबत घेऊन काढावा. किंवा भाजपमध्ये जाण्यासाठी तुम्ही आधीपासूनच तयार आहात तर तुमची चार चौकडी घेऊन तुम्ही जावे, तुमच्या कृतघ्नतेचा तीव्र निषेध, असा हल्लाबोल लवांडे यांनी केला आहे.

दरम्यान, रायगड जिल्ह्यातील इंदापूर येथे नवनिर्वाचित जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य यांचा भव्य सत्कार सोहळा २७ मार्च रोजी आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्याच्या बॅनरवर सर्वात मोठा फोटो सुनील तटकरे यांचा लावण्यात आला आहे, त्यानंतर अदिती तटकरे व अनिकेत तटकरे यांचा फोटो लावण्यात आला. त्यानंतर नवनिर्वाचित सदस्यांचा फोटो लावण्यात आला. मात्र, पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार तसेच अजित पवार यांचा फोटो वगळण्यात आला असल्याचे पाहायला मिळत आहे. यावरून सुनील तटकरे यांच्यावर टीका केली जात आहे.

अजित पवार गटाचे आमदार अमोल मिटकरी यांनी देखील या घटनेवर निषेध व्यक्त केला आहे. त्यांनी ट्विट करत म्हटले की, ज्यांच्या नेतृत्वावर कार्यकर्त्यांचा विश्वास आहे, त्यांचाच फोटो हटवला जातोय, हे राष्ट्रवादीचा सर्वसामान्य कार्यकर्ता कधीही सहन करणार नाही. राष्ट्रवादीच्या दैवताना डावलून स्वत: देव बनण्याचा कुणी प्रयत्न करू नये. महाराष्ट्र हे सहन करणार नाही.

# इराण-इस्त्रायल युद्धाचा राज्याच्या शेतीला फटका : निर्यात ठप्प, युरियाच्या साठ्याबाबत कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी व्यक्त केली चिंता



**मुंबई** : इराण आणि इस्त्रायल-अमेरिका यांच्यात वाढत चाललेल्या संघर्षामुळे जागतिक अर्थव्यवस्थेवर मंदीचे सावट असतानाच, याचे थेट परिणाम आता महाराष्ट्रातील शेती क्षेत्रावरही दिसू लागले आहेत. या युद्धामुळे आखाती देशांतील शेतीमालाच्या आयात-निर्यातीवर १०० टक्के परिणाम होणार असून, देशातील माल निर्यात न झाल्याने बाजारभावात मोठी घसरण पाहायला मिळत आहे. या पार्श्वभूमीवर राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी चिंता व्यक्त केली असून, भविष्यात युरिया खताच्या साठ्याबाबतही काळजी घ्यावी लागणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या युद्धामुळे आंतरराष्ट्रीय व्यापार विस्कळीत झाला आहे. भारताचा शेतीमाल या देशांमध्ये मोठ्या प्रमाणात निर्यात होतो, मात्र देशातील शेतीमाल बाहेर जात नसल्याने बाजारभावावर त्याचा मोठा परिणाम दिसून येत आहे. स्थानिक बाजारपेठांमध्ये शेतीमालाचे भाव कोसळले आहेत. याचा फटका थेट शेतकऱ्यांच्या उत्पन्नाला बसत आहे. "निर्यात ठप्प झाल्याने बाजारात मालाची आवक वाढली असून भाव पडले आहेत. तसेच, खत निर्मितीसाठी लागणाऱ्या कच्च्या मालाच्या पुरवठ्यावर परिणाम झाल्यास भविष्यात युरियाचा तुटवडा भासू शकतो, त्यासाठी आत्तापासूनच नियोजन करावे लागेल," असे मंत्री भरणे यांनी सांगितले.

राज्यात अनेक ठिकाणी झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. सरकारने या नुकसानीचे तातडीने पंचनामे करण्याचे आदेश दिले असून अहवाल प्राप्त होताच मदत जाहीर केली जाईल, असे आश्वासन कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले. दरम्यान, १७ एप्रिलनंतर तापमानात मोठी वाढ होणार असून ऑगस्ट महिन्यापर्यंत पावसाचे प्रमाण कमी राहण्याचा अंदाज आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पाण्याचा अत्यंत काटकसरीने वापर करावा, असे आवाहनही त्यांनी केले.कोकणातील अर्थव्यवस्थेचा कणा असलेला काजू आणि आंबा उत्पादक शेतकरी यंदा हवामान बदलामुळे उद्ध्वस्त झाला आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे काजूच्या उत्पादनात तब्बल ६० ते ६५ टक्क्यांची घट झाली आहे. वाढते तापमान आणि अवेळी आलेला पाऊस यामुळे बागायतदार हवालदिल झाले आहेत. कोकणात आलेले थोडेफार उत्पन्नही आता नैसर्गिक आपत्ती आणि जंगली प्राण्यांच्या हल्ल्यामुळे वाया जात असल्याने शेतकरी दुहेरी कात्रीत सापडला आहे.सिंधुदुर्ग जिल्ह्यातील काजू बागायतदारांसमोर आता एक विचित्र पेच निर्माण झाला आहे. राज्याचा राज्य प्राणी असलेला 'शेकरू' आता काजूच्या कोवळ्या बिया खाऊन बागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान करत आहे. सर्वात मोठी अडचण म्हणजे, वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात नुकसान भरपाई देणाऱ्या शासकीय यादीत 'शेकरू' या प्राण्याचा समावेश नाही. त्यामुळे प्रचंड नुकसान होऊनही शेतकऱ्यांना एक रुपयाचीही मदत मिळत नाही. शेकरूचा समावेश नुकसान भरपाईच्या यादीत करावा, अशी आर्त हाक सिंधुदुर्गातील शेतकऱ्यांनी दिली आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ३० मार्च २०२६


## बीड जिल्ह्यात SIR-२०२५ पूर्वतयारीला गती ; ७१.१५ टक्के काम पूर्ण

**बीड (भगवंत पाळवदे) :** जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयाच्या वतीने विशेष पुनरिक्षण कार्यक्रम (SIR-२०२५) अंतर्गत सुरू असलेल्या पूर्वतयारी कामांना वेग आला असून आतापर्यंत ७१.१५ टक्के काम पूर्ण झाल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.या मोहिमेत प्रामुख्याने Pre-SIR Mapping, Demographical Similar Entries तपासणी, Duplicate व Non-Differential नोंदींची छाननी, तसेच घरभेटी (BLO Calls) आदी कामांवर भर देण्यात येत आहे. जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्र स्तर अधिकारी (BLO) आणि बूथ लेव्हल एजंट (BLA) यांच्या समन्वयातून ही प्रक्रिया राबवली जात आहे. प्रशासनाकडून मिळालेल्या माहितीनुसार, जिल्ह्यातील एकूण २४१६ मतदान केंद्रांपैकी सुमारे २२.४३ लाख मतदार नोंदींची तपासणी करण्यात आली असून त्यापैकी सुमारे १५.९६ लाख नोंदींचे काम पूर्ण झाले आहे. तालुकानिहाय कामगिरीत काही ठिकाणी ८० टक्क्यांहून अधिक प्रगती झाली असून काही भागात कामाला आणखी गती देण्याची गरज आहे.अधिकाऱ्यांनी सांगितले की, SIR-२०२५ अंतर्गत मतदार याद्या अधिक अचूक व पारदर्शक करण्यासाठी विशेष प्रयत्न सुरू आहेत. नागरिकांनीही या प्रक्रियेत सहकार्य करून आपली माहिती अद्ययावत करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.दरम्यान, संबंधित सर्व यंत्रणांना वेळेत काम पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून उर्वरित काम लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने मोहीम राबवली जात आहे.

## "आई" कवितेने रंगले २ रे साहित्य कविसंमेलन







**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) :** छत्रपती संभाजीनगर येथे दुसरे शिक्षक साहित्य संमेलन घेण्यात आले होते. त्यामध्ये स्वागतअध्यक्ष म्हणून संभाजीनगर जिल्हा परीषदेच्या माध्यमिक शिक्षणाधिकारी श्रीमती आश्विनीताई लाठकर- पानसरे यांनी कार्यक्रमाची सर्व सूत्र हाती घेऊन दूसरे शिक्षक संमेलन यशस्वी केले. यामध्ये निमंत्रितांचे कवि संमेलनाचे अध्यक्ष म्हणून प्रसिद्ध कवी अय्युब पठाण लोहगांवकर हे होते. कवि संमेलनात 25 शिक्षक-शिक्षका कवीने सहभाग घेतला होता. कवि संमेलनाची सांगता अय्युब पठाण यांच्या " आई " या कवितेने झाली. अय्युब पठाण यांनी " आई " या कवितेचे सादरीकरण इतके प्रभावीपणे केले की सुरुवातीलाच शेरोशाहीरीने सर्व सहभागी शिक्षक-शिक्षिकांना भरपूर हसविले आणि कविता सादरीकरन रंगात येत असतानाच पठाण यांनी आपल्या मधूर आवाजात करुणरसामध्ये व शिवरंजनी रागामध्ये आणि पंजाबी गीत असलेल्या " गोरी रे मै जाना परदेश " या गहीवरल्या चालीत कविता गायली. ही कविता ऐकून सभागृहातील सर्वाचे डोळे पाणावले. कवितेचे प्रभावी सादरीकरण आणि अय्युब पठाण यांची सेवानिवृतीमुळे माध्यमिक शिक्षणाधिकारी आश्विनी लाठकर हे " आई " कविता ऐकून खुप भावनिक झाल्या आणि त्यांनी अय्युब पठाण लोहगावकर यांना दुसऱ्या दिवशी जिल्हा परिषद कार्यालयात बोलावून आनंदाने पेढा भरविला. आणि पुढच्या साहित्य लेखनास शुभेच्छा दिल्या.

## ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमात छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्त कार्यालयाची दमदार कामगिरी; राज्यात द्वितीय क्रमांक

**बीड (भगवंत पाळवदे) :** महाराष्ट्र शासनाच्या '१५० दिवसांचा ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रम' अंतर्गत झालेल्या राज्यस्तरीय मूल्यमापनात छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्त कार्यालयाने उल्लेखनीय कामगिरी करत राज्यात द्वितीय क्रमांक पटकावला आहे. डिजिटल रूपांतरणाच्या दिशेने ठोस पावले उचलत विभागाने राज्यात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. आज मुंबई येथील सह्याद्री सभागृहात पार पडलेल्या समारंभात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांना प्रशस्तीपत्र प्रदान करून गौरविण्यात आले.राज्य शासनाच्या या महत्त्वाकांक्षी उपक्रमांतर्गत जिल्हा, विभाग आणि राज्यस्तरावरील शासकीय कार्यालयांच्या कामकाजाचे सात महत्त्वपूर्ण निकषांवर सखोल परीक्षण करण्यात आले. संकेतस्थळ व्यवस्थापन, 'आपले सरकार' सेवा, ई-ऑफिस प्रणाली, कार्यालयीन डॅशबोर्ड, व्हॉट्सॲप चॅटबॉट, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), ब्लॉकचेन तंत्रज्ञान तसेच भौगोलिक माहिती प्रणाली (GIS) यांसारख्या आधुनिक साधनांचा प्रभावी वापर करून छत्रपती संभाजीनगर विभागाने प्रशासन अधिक स्मार्ट, पारदर्शक आणि गतिमान बनवले आहे.ही मूल्यांकन प्रक्रिया दोन टप्प्यांत पार पडली असून अंतिम मूल्यमापन भारतीय गुणवत्ता परिषद यांच्याकडून करण्यात आले. या स्पर्धात्मक प्रक्रियेत राज्यातील सर्व विभागीय आयुक्त कार्यालयांमधून द्वितीय क्रमांक मिळवणे ही मोठी आणि अभिमानास्पद कामगिरी मानली जात आहे.विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांचे दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व, नियोजनबद्ध कार्यपद्धती आणि अधिकारी-कर्मचाऱ्यांचे समन्वित प्रयत्न निर्णायक ठरले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली ई-गव्हर्नन्स उपक्रमांची काटेकोर अंमलबजावणी करण्यात आली. विभागनिहाय सातत्यपूर्ण आढावा, ई-ऑफिसचा प्रभावी वापर आणि नागरिक-केंद्रित निर्णय प्रक्रियेवर भर दिल्याने प्रशासन अधिक सक्षम आणि परिणामकारक झाले आहे.ई-गव्हर्नन्सच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे शासकीय सेवा वितरणात पारदर्शकता, वेग आणि सुलभता वाढली आहे. विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले. विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर म्हणाले "१५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स कार्यक्रमामुळे शासकीय कामकाज अधिक पारदर्शक, गतिमान आणि तंत्रज्ञानाधारित झाले आहे. ही कामगिरी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सामूहिक प्रयत्नांचे फलित असून, भविष्यातही प्रशासन अधिक लोकाभिमुख करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर सातत्याने केला जाईल. तंत्रज्ञानाच्या प्रभावी वापरातून नागरिकांना अधिक जलद, पारदर्शक व सुलभ सेवा देण्यावर आम्ही भर दिला. या यशामागे सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांचे समर्पण व टीमवर्क आहे.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002


## "अंबाजोगाईत चिमुरडीचा धक्कादायक मृत्यू; अत्याचाराचा पर्दाफाश - उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांची कडक भूमिका"



**बीड (भगवंत पाळवदे) :** जिल्ह्यातील अंबाजोगाई तालुक्यात घडलेल्या २ वर्षे ५ महिने वयाच्या चिमुरडीवरील अत्याचार व मृत्यूची घटना अत्यंत संतापजनक असल्याचे सांगत उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी प्रशासनाला तातडीने कठोर कारवाई करण्याच्या सूचना केल्या आहेत.प्राथमिक तपासात मृत्यू अपघाती असल्याचे सांगण्यात आले होते; मात्र शवविच्छेदन अहवालातून लैंगिक अत्याचार स्पष्ट झाल्याने प्रकरण गंभीर झाले असून, हा अहवाल महत्त्वाचा पुरावा ठरत आहे. पोलिसांनी अल्पवयीन आरोपीला ताब्यात घेतले असून गुन्ह्याची नोंद भारतीय न्याय संहिता २०२३ व बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण (POCSO) कायद्यानुसार करण्यात आली आहे.घटनेची गांभीर्याने दखल घेत डॉ. नीलम गोऱ्हे यांनी बीडच्या पोलीस अधीक्षकांना निवेदनाद्वारे या प्रकरणाचा तपास जलदगती न्यायालयात चालवून आरोपीस कठोर शिक्षा देण्याची मागणी केली आहे. तसेच तपास पारदर्शक ठेवून सर्व वैद्यकीय व भौतिक पुरावे भक्कमपणे सादर करावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.आरोपी अल्पवयीन असल्याने त्याच्यावर कायद्यानुसार बाल सुधारगृहात ठेवण्याची प्रक्रिया काटेकोरपणे राबवावी, असे त्यांनी नमूद केले.पीडित कुटुंबाला समुपदेशन व सुरक्षा देण्याबरोबरच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी बालसुरक्षा व जनजागृती मोहिमा राबविण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ३० मार्च २०२६


## परळी बसस्थानक परिसरात सापडलेल्या दीड वर्षांच्या मुलीबाबत पोलीसांची शोध मोहीम सुरू

**बीड (भगवंत पाळवदे) :** परळी बसस्थानक परिसरात एका दीड वर्षांच्या मुलीला तिच्या आई-वडिलांनी किंवा पालकांनी उघड्यावर सोडून दिल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, दिनांक ३० जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ७ वाजण्याच्या सुमारास परळी बसस्थानक परिसरात संबंधित मुलगी आढळून आली. याबाबत सालोमन मायकल कसबेकर (वय ५२, व्यवसाय – नोकरी, अधीक्षक आशा शिशुगृह, परभणी, रा. चिद्रावर नगर, जुना पेंढगाव रोड, परभणी) यांनी दिनांक २६ मार्च २०२६ रोजी संभाजीनगर परळी वैजनाथ पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली.या फिर्यादीवरून पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम ९३ अन्वये गुन्हा दाखल केला असून, या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक ए. टी. शिंदे हे करीत आहेत.दरम्यान, तपासादरम्यान संबंधित मुलीचे आई-वडील किंवा पालकांचा शोध घेणे अत्यंत आवश्यक असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. जर कोणाला या मुलीबाबत किंवा तिच्या पालकांबाबत कोणतीही माहिती असल्यास त्यांनी तात्काळ संभाजीनगर परळी वैजनाथ पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल, असेही पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

## अब्दिमंडी च्या डोंगराला लागली आग, लाखमोलाची वनस्पती खाक तर अनेक वन्यजीव, सरपटणारे प्राणी जळून खाक



**दौलताबाद (जावेद अहमद) :** दौलताबादच्या पूर्वेस असलेल्या मोमीन आरिफ दर्गा च्या अब्दिमंडी येथील डोंगराला शनिवारी संध्याकाळी सहा वाजेच्या सुमारास अचानक आग लागली यामुळे लाखमोलाचे वनस्पती जळून झाली सुदैवाने जीवित हानी टळली. शनिवारी संध्याकाळी सहा वाजेच्या सुमारास अब्दिमंडी येथील डोंगरावर अज्ञात व्यक्तीने जळती विडी किंवा सिगारेट टाकल्याने आग लागली असावी पाहता पाहता आगीने उग्र रूप धारण केले या आगीमुळे लाख मोलाचे वनस्पती,तसेच सरपटणारे प्राणी वन्यजीव चिमण्यांची घरटी जळून खाक झाली आग लागल्याची माहिती मिळताच वनपाल सुधीर धवन,वन रक्षक पुरुषोत्तम बायाळ,मयूर चौधरी,प्रभुदास हजारे,विनायते,विजय चौहान हे आग आटोक्यात आणण्यासाठी रात्री उशिरापर्यंत काम करत होते रात्र झाल्यामुळे व जोरदार वारा सुटल्याने काही ठिकाणी डोंगराच्या कपारी,वाळलेली मोठी झाडे यामुळे आग विजवण्यासाठी अडथळे येत होती.

# चंद्रकांत गणपतराव पाटील यांचा आज सेवानिवृत्ती सोहळा

**धाराशिव :** जिल्ह्यातील उमरगा तालुक्यातील कलदेव निंबाळा येथील रहिवाशी चंद्रकांत गणपतराव पाटील मुख्याध्यापक तथा विस्तार अधिकारी शिक्षण पंचायत समिती उमरगा जिल्हा धाराशिव हे दिनांक ३१ मार्च २०२६ रोजी सेवा निवृत्त होत आहेत. यानिमित्त ३० मार्च २०२६ रोजी सकाळी दहा वाजता गौरव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी धाराशिव जिल्हा परिषदेच्या नूतन उपाध्यक्षा सन्माननीय उषाताई रवींद्र गायकवाड, उमरगा पंचायत समितीच्या नूतन सभापती एडवोकेट आकांक्षा चौगुले, धाराशिव जिल्हा परिषदेचे सदस्य, सन्माननीय रफिक तांबोळी, महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष सन्माननीय प्राध्यापक सुरेशराव बिराजदार, केसर जवळग्याचे माजी सरपंच अमोल पटवारी आदी मान्यवर निमंत्रित करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी निवृत्त मुख्याध्यापक गणपतराव पाटील हे असणार आहेत. कलदेव निंबाळ्याच्या सभागृहामध्ये कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

## विचारात

विचारात सुख ! विचारात दुख!
नको रुखरुख! विचारात!!

विचारात क्रांती! शोधाची जननी !
विचारच ऋणी! जीवनात!!

विचारात साव! विचारात देव!
विचारात भेव! दडलेले !!

विचारात शुद्धी! भविष्याला दिशा !
अन्यथा दुर्दशा! लिहिलेली!!

विचाराचे बीज! पेरता रानात!
आनंद मनात! फुललेला!!

विचार अंगार! विचार भंगार!
विचार सागर ! खोल खोल!!

विचारात प्रेम! विचारात द्वेष!
विचारात क्लेश! चोहीकडे!!

विचारात प्रश्न ! प्रश्नाला उत्तर !
जगी बेहत्तर! विचारच!!

विचाराचे पंख! आकाशी भरारी!
विचारच वारी ! आयुष्याची!!

विचार निर्मळ ! जगणं सुंदर!
मनी हुरहुर!विचाराने!!

**ज्ञानेश्वर गायके**
**कन्नड**

## सत्ता आणि सावल्या

दररोज स्क्रीनवर उलगडतं नवं नाटक
घोषणांचा गोंगाट आणि मुठींचा संवाद
जनतेच्या नावावर सत्तेची धाव
आणि स्वाभिमान मात्र शांत उभा

कधी हाणामारी, कधी शब्दांची तलवार
कधी खुर्चीसाठी उघडपणे युद्ध
आणि त्याच नेत्यांचे वाकलेले मस्तक
भोंदू बाबांच्या चरणी नतमस्तक

ही तीच भूमी का ?
जिथे छत्रपती शिवाजी महाराजांनी
स्वराज्य उभं केलं
जिथे महात्मा फुलेंनी
समतेची ज्योत पेटवली,
जिथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी
हक्कांची भाषा दिली?

मग आज का विचार हरवले
आणि उरली फक्त सत्तेची भूक?
जनतेच्या विश्वासाचा किल्ला
हळूहळू ढासळतो आहे

उठा—प्रश्न विचारा,
कारण महाराष्ट्र अजून जिवंत आहे
फक्त गरज आहे एका ठिणगीची
जी सत्तेपेक्षा समाजाला मोठं मानेल

**काव्यरचना//**
**संदिप नानासाहेब वाकडे**
**रा.खेडा ता.कन्नड**
**९७६६९९२७७६**


दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

**जाहिरात दर**

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर
**साहिल कॉम्प्युटर्स अँण्ड प्रिंटर्स**
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103

**डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)**

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ३० मार्च २०२६


# राजेंद्र गव्हाणे यांना शासनाचा व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार प्रदान



**कन्नड (अरुण थोरात) :** व्यसनमुक्ती आणि समाज प्रबोधनाच्या क्षेत्रात मोलाचे योगदान दिल्याबद्दल सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रात कार्यरत असलेले राजेंद्र गव्हाणे यांना राज्य शासनाचा मानाचा 'राष्ट्रपिता महात्मा गांधी राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले.मुंबई येथील यशवंतराव चव्हाण सेंटरमध्ये दि. २६ मार्च रोजी आयोजित करण्यात आलेल्या दिमाखदार सोहळ्यात हा सन्मान प्रदान करण्यात आला. याप्रसंगी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाठ, सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे, समाजकल्याण आयुक्त दीपा मुधोळ-मुंढे, उपायुक्त पी. बी. वाबळे, माजी गृह राज्यमंत्री सिद्धराम म्हेत्रे, आमदार डॉ. तुषार राठोड आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.या गौरव सोहळ्याप्रसंगी बोलताना राजेंद्र गव्हाणे म्हणाले, की हा पुरस्कार गेल्या वीस वर्षांपासून केलेल्या कामाची पावती आहे. या पुरस्कारामुळे जबाबदारी आणखी वाढली आहे. माझी पत्नी संगीता, तसेच मोहित आणि हर्षदा या माझ्या मुलांनी मला वेळोवेळी साथ दिल्यानेच मी या पुरस्काराच मानकरी ठरलो. हा पुरस्कार मी माझ्या आईवडिलांना अर्पण करतो, अशा शब्दांत त्यांनी आपली कृतज्ञता व्यक्त केली. राजेंद्र गव्हाणे यांना मिळालेल्या या राज्यस्तरीय पुरस्कारामुळे कन्नड येथील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातून त्यांचे कौतुक होत आहे.

**व्यसनमुक्तीवर जागृती कार्य :** -राजेंद्र गव्हाणे गेल्या २० वर्षांपासून शिक्षण क्षेत्रात कार्यरत असून, सामाजिक क्षेत्रातही त्यांनी उल्लेखनीय योगदान दिले आहे. तरुण पिढीला व्यसनांपासून दूर राहण्यासाठी विविध उपक्रम राबविले असून, अनेकांनी व्यसनमुक्तीचा मार्ग दाखवला आहे. गरीब विद्यार्थ्यांना आर्थिक, तसेच शालोपयोगी साहित्य वाटप केले आहे. निवासी वसतिगृहातील विद्यार्थ्यांना व्यसनमुक्तीचे प्रबोधन केले आहे. या पुरस्कारामुळे कन्नड तालुक्यातील सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रातील कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# मुकुंदवाडी शाळेत रोटरी क्लबकडून सॅनिटरी सुविधा वितरण



**छत्रपती संभाजीनगर :** रोटरी क्लब ऑफ छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत मनपा केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, मुकुंदवाडी येथे विद्यार्थिनींसाठी Sanitary Napkin Vending Machine व Incinerator प्रदान करण्यात आले. या उपक्रमामुळे शाळेतील मुलींच्या आरोग्य, स्वच्छता व सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण पाऊल उचलले गेले असून विद्यार्थिनींना मोठा लाभ होणार आहे. या प्रसंगी रोटरी क्लबचे प्रोजेक्ट चेअरमन मा. श्री सुरज डुमणे, अध्यक्ष मा. श्री अनय फणसळकर, तसेच सदस्य श्री सतीश लोणीकर व श्री सुनील बागुल उपस्थित होते. कार्यक्रमावेळी शाळेचे मुख्याध्यापक श्री काळू बुधा चौधरी सर व सर्व शिक्षक-शिक्षिकांनी या उपक्रमाचे मनःपूर्वक स्वागत करून रोटरी क्लबचे आभार मानले. या प्रकल्पाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी रोटरी क्लबच्या समन्वयक व शाळेतील शिक्षिका श्रीमती वर्षा बरसाले यांनी विशेष प्रयत्न केले.

# आदर्श विद्यार्थी

अभ्यासू व जिज्ञासू
असावा विद्यार्थी
मनी नको अहंकार
नको नियत स्वार्थी

खेळकर असावी वृत्ती
पण नको धिंगामस्ती
अंगी असावी सदा
कर्तव्याशी दोस्ती

नको कामचुकारपणा
नको अंगी आळस
आत्मविश्वासाने
चढावा यशाचा कळस

जेष्ठांना वंदन करुन
सदा आशीर्वाद घ्यावा
सुप्त कला गुणांना
नेहमी वाव द्यावा

चांगल्या मित्रांशी
संगत नेहमी जडावी
आदर्श विद्यार्थी म्हणून
जगी कीर्ती घडावी



**- रविंद्र व्ही. चालीकवार**
मो.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

# संपू दे अंधार सारा

संपू दे अंधार सारा
बळी राजाच्या जीवनी
करू आपण प्रार्थना
विठ्ठलाच्या हो चरणी

रोज रोज राबतोय
बाप माझा रे मातीत
अहोरात्र तो झटतो
घाम गाळूनी शेतीत

रात्रदिन करी काम
जीवनाच्या रणागणी
करी संघर्ष रे सदा
भूमातेच्या रे प्रांगणी

सुखी व्हावा बळीराजा
हीच मंगल कामना
करू रे हात जोडूनी
निर्मिकास आराधना

संपू दे अंधार सारा
हर्ष मिळू दे जीवनी
पिकू दे शेतात पीक
देऊ तुला रे पर्वणी



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**


## जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

ADMISSION OPEN
10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses
DMLT | P.G.DMLT
X-RAY | C.T.-SCAN
E.C.G. | Radiology
Physiotherapy | Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology
Contact: 9405109103
8830838903


# अज्ञाताने लावली आग फळबाग जळुन झाली खाक



**दौलताबाद (जावेद अहमद) :** समृद्धी महामार्गाच्या बाजूला गट न ४८ मोजे तळेसमान आसेगाव तालुका गंगापूर येथील शेतकरी आसिफ खान इसाक खान पठाण यांच्या शेतातील फळबागेला अज्ञात व्यक्तीने आग लावल्याचे दि २८ ला उघळकीस आली आठ एकर शेती असून त्यापैकी त्यांनी दोन एकर तीस गुंठे फळबाग लागवड केली होती त्यात आंबाची ५० झाडे, चिंचची २५ ,पेरू १२०० झाडे , चिकू ची १० झाडे, शेवगा १० झाडे व ठिबकद्वारे पाइपलाइन टाकलेली आहे दि २८ शनिवारी सकाळी अकरा वाजता आसिफ खान हे दि २८ सकाळी अकरा वाजता शेतात चकर मारण्यासाठी गेले असता शेतात असलेल्या घराजवळील लाकडे व शेतातील झाडे जळत असताना दिसून आली त्यांनी मदतीला बाजूच्या शेतकरी ना बोलावून घेतले पण आगीने रौद्ररूप धारण केले होते बघता बघता सर्व लहाने झाडे व पूर्ण पाइपलाइन जळून खाक झाली होती व आंब्याच्या झाडाला आग लागल्याने आंबे जळून खाली पडले आहेयात त्यांचे मोठे नुकसान झाले आहेयाबाबत आसिफ यांनी दौलताबाद पोलीस स्टेशनमध्ये अर्ज केला आहे ग्राम महसूल अधिकारी यांच्याशी फोन वर संपूर्ण साधला असता रविवार असल्याने संपर्क होऊ शकले नाही सात वर्षची झाडे जळून गेले व अनेक झाडे होरपळून मोठे नुकसान झालेआहे शासनाने आपल्या मदत करावी अशी मागणी शेतकरी यांनी केली आहे.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ३० मार्च २०२६

# वळीवाच्या वेळा : सर्वहरा समाज व्यवस्थेची चिंतन चिकित्सक कविता




जेष्ठ कवी अजीम नवाज राही,एक निस्सीम काव्यभक्तीचे नमाजिस्त मौलवी.व्यवहाराचा काळा घोडा, कल्लोळाचा एकांत, वर्तमानाचा वतनदार,तळमळीचा तळ,वळीवांच्या वेळा या पाच काव्यसंपादा त्याची विरासत आहेत.शालेय व विद्यापीठीय अभ्यासक्रमात सविनय नोंद झाली आहे.शासकिय निमशासकीय संस्थेचे अनेक पुरस्कार व कवी संमेलनाचे अध्यक्ष तथा महाराष्ट्रभर वक्ते साक्षेपी निवेदक म्हणून ख्याती.'वळीवांच्या वेळा' ही सखेद अवकळी कळेची शब्दांकित वेदना आहे.कविता ही एक निस्सीम अंतरीची अस्सल सल होऊन येते आणि सामाजिक व्यापक्ता प्रकट करते.या कवितेने सर्वहारा समाज व्यवस्थेचा चिंतन चिकित्सक वर्तमान मांडला आहे.अजीम नवाज राही साहब यांची कविता ही माणुसकीच्या गहिवरलेपणाची नोंद आहे.कवी माणसाशिवाय राहूच शकतं नाही.कोरोना काळातले इस्पितळातले दिवस आणि 'निरपेक्ष शुभेच्छांचा खळाळ'.आभाळ काळजीने बरसले मनमुराद' ही शब्द घनव्याकुळ होऊन मानसाच्या जिव्हाळयांची कविता 'वळीवांच्या वेळा' होऊन येते.लुटपुटीचा झगडा,मनातल्या मनातच बोलत राहतो माणुस.कळपाचे तत्वज्ञान असेच आहे.'नाराज ढोरांना मोकाट फिरू देणे,त्याची मनधरणी करत नाही, दिलजमाई ही करतं नाही.ही मानवी प्रवृत्तीची सखेद भेदक वास्तवमांडणारी कविता आहे.तर,'मी कविता लिहितो म्हणजे,रचत नाही शब्दांची उतरंड निरर्थक' ही कविता अतिशय खोलवर मुरवून झिरपत येते.जसे. "बदलत्या जमान्यात हायटेक लखलखाट फिरकलाच नाही दीनवान्या मोहल्ल्याकडे चुकून. जिथे पानझडीचा मोसम ठाण मांडून तिथे शक्यचं नाही नव्यानवतीची कविता लिहिणे" (पृष्ठ 14) 'जाणीवांची ओली मुळे',ही कविता माणुसकीची ओल देऊन जाते.फत्तरदिल शहराने हुसकावून लावले,कानात घोंगावणारा शंकाकुशंकाचा वारा,मस्जिद,मंदिराच्या चौथाऱ्यावर भेटणारा जीवाभावाचा इसम,कवितेन कवीचा केलेला सन्मान.म्हणजे कणगीभरून प्रेम दिले.गावं,मोहल्ला, कोंबड्या, बकऱ्या, कष्टकरी कामगार माणसं, त्यांच्या भूक भाकरीचा रोजगारच्या तळमळीचा वृतांत ही कविता मुखर करते.अभिव्यक्तीच्या झोळी मधून,कोरभर भाकरीसाठी, गयावया करणारी पराधीन, दारूसाठी बकऱ्यांचा पाला विकणारा प्रल्हाद,आधंळा मामू, मोलमजुरी करून नांतवांचा सांभाळ करणारी जिगरबाज हालीमा मुमानी,अशी साक्षात संघर्ष जगणारी माणसं नात्यापेक्षा ही कवीला कायमचं आपल्या मायाळू झोळीत टाकून व्यक्त करावी वाटतात. ही सर्वहारा वेदनेची कविता आहे.रात्र, ओढा,नदी आणि कविता कोरोना काळाचे विदारक चित्र,नर्सेसची खाजगी कुजबुज,फजरच्या अजानचे स्वर, स्ट्रेचरवर जाताना नमस्कारासाठी जोडले हात,हा दुःखाचा पीळ कवीने व्यक्त केला आहे.'प्राणवायू'प्रत्येक वादळवाऱ्यात तगतोय् हिच कविता झाली प्राणवायू म्हणून जगतोय् ही मरणासन्न मिठी मन विव्हळून टाकते."कविता नसती तर,कुठे असतो मीही, खितपत पडलो असतो, गावच्या काळोख्या कोपऱ्यात कुजत.कवीला जगण्याची उर्मी कविता देते.कवितेवरची निस्सीम भक्ती.हे 'भावविश्व'मरणयातनाचे भरणपोषण करणारी इथली माणुसकीची मायाळू माती.हे 'उदासीचे उंच गड' ही दिवसाची खफमर्जीमस्तवाल ऐरावती दिवस,ही 'अथांग जाणीव'हे मृत्युचे दिवस कसे गेले? सबुरीचा कणा,धास्तीचा फणा मनाला मुर्गळून बिनधास्त जगण्याची उमेद या कवितेने दिली आहे कवी अजीम नवाज राही साहब यांच्या कवितेचा मर्मग्राही अनुबंध म्हणजे सर्वहारा वेदनेचा माणूस जो गावं माती व गाव मातीत कष्टकरी,मोहोल्ला मोहोल्ल्याशी समरसून गेलेला सर्वधर्मीय सभोवताल त्यांच्या कवितेचा आत्मानुबंध आहे.या कवितेने समकालीन सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक राजकीय,परिप्रेक्ष्यांची गहिवरणारी गुंफण करून एक मायाळू पदराचा उलगडा केला आहे. या वास्तवाचे तटस्थपणे ही कविताभाष्यकरते.'कातरवेळ'वृद्धापकाळा ने मेलेल्या पाळीव पोपटाच्या शोकात आयुष्यभर फळाहार नाकारनारा बुजुर्ग दर्ग्याला पाट टेकून सांगतो.रानावनाच्या कथा सुरस.पाखरांनी गलबते प्रत्येक कहाणी."डोळ्यात आणते चटकन् पाणी.म्हाताऱ्याच्या सुरकुतलेल्या चेहऱ्यावर रिंगण धरतो पोपटी रंगाचा खेळ आसवांत चिंब भिजते मोहल्ल्याची कातरवेळ"(पृष्ठ 40)ही कविता संयत मनोभूमिकेतून अस्सल ठणक ही कविता देऊन जाते. आपल्या अब्बाजान विषयी, ईद बकरी ईदला घरात काहीचं गोडधोड झाले नाही.अब्बा नदी विषयी सांगयचे.परिस्थितीने जगणं शिकवलं पण सारी रात नदी रातभर अब्बाच्या डोळ्यांतून वाह्यची.असा अस्सल जगण्याचा अनुभव ही कविता देऊन जाते.प्रा डॉ मिलिंद बागुल पाठराखण देतात"गाव,गावमाती,गावामातील माणसं, मोहल्ला, मोहल्ल्याला लगडलेल्या सर्वधर्मीय भोवतालशी 'वळीवांच्या वेळा' मधली कविता समरसून गेलेली.जाणिवा आणि आविष्कारांच्या पातळीवरची प्रयोगशीलता कवितागणिक नवीन होत गेलेली.समकालीन, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय परिप्रेक्ष्याचे अनेक पदर उलगडत ती तटस्थपणे भाष्य करत पुढे सरकत जाते.यापुर्वीच्या कवितासंग्रहां पेक्षा 'वळीवाच्या वेळा' मधील कविता भाषा, अनुभव अन् चिंतन मांडणीच्या अंगाने पुढचा टप्पा गाठणारी समग्र चिंतीत वर्तमान कवेत घेणारी आहे".हे अभ्यासक विवेचन या कवितेचं समर्पक समृद्ध सकारात्मक विचारधारेची भूमिकानिष्ठ अभिव्यक्ती मांडते.राही साहेबांचे अर्पणपत्र "काळजीची काडी,काडी वेचून निर्हेतूक दोस्तीचा भावनिक खोपा आकारणारे आमच्या गोतावळ्याचे सुत्रधार स्व.समाधान सावळे पाटील यांच्या पावन स्मृतीस!"हे मनोगत म्हणजे निर्लेप निस्पृह श्रद्धेय भावनेचे पाझलेपण आहे. ख्यातनाम चित्रकार सरदार जाधव यांचे मुखपृष्ठ म्हणजे 'अथांग वळीवांच्या सागर लाटेचा मनस्वी माणूस'अथर्व पब्लिकेशन्स् चे अतिशय देखणे पुस्तकं मनन तरल करून टाकणारे.शब्द स्नेही राही साहेबांनी जाणिवपूर्वक पुस्तक पाठवून माझ्या मनाचे भरणपोषण केले.त्यांच्या कायम सहृदयी ऋणाईत.मनस्वी हार्दिक शुभेच्छा.



**पुस्तकाचे नावं:-'वळीवांच्या वेळा'**
**(कवितासंग्रह)**
**लेखक:-कवी अजीम नवाज राही**
**प्रकाशक:-अथर्व पब्लिकेशन्स अमरावती**
**प्रथमावृती:- 1 डिसेंबर 2025**
**मुखपृष्ठ:-सरदार जाधव**
**किंमत:-300/-**
**पुस्तक परिचय:- डॉ प्रभाकर शेळके जालना**

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002